1 9 DEC 2025

जनप्रवास



पर्यावरण अधिविभागातर्फे आयोजित कार्यक्रमात पुस्तक प्रकाशन करताना डॉ. व्ही. एन. शिंदे. सोबत डॉ. असावरी जाधव, डॉ. श्रुती कुलकर्णी, डॉ. पी. डी. राऊत आदी.

# संशोधकांसह नागरिकांना मार्गदर्शक पुस्तक

## कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे प्रतिपादन

**जनप्रवास** : कोल्हापूर

कृषी विज्ञान, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, भूविज्ञान आदी विविध शाखांमध्ये उपयुक्त ठरणारे आहे. संशोधकांपासून सामान्य नागरिकांपर्यंत सर्वांसाठी मार्गदर्शक ठरणारे हे पुस्तक असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले, असे प्रतिपादन डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभाग व पर्यावरण संरक्षण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पर्यावरण जाणीव जागृती कार्यशाळेत ते बोलत होते. याप्रसंगी क्लायमेट चेंज अँण्ड सस्टेनेबल डेव्हलपमेंट या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. हे पुस्तक डॉ. आसावरी जाधव, डॉ. प्रकाश डी. राऊत आणि डॉ. सुकांता मंडल यांनी संपादित केले आहे.

प्रस्ताविक डॉ. आसावरी जाधव यांनी केले. सिनेट सदस्य डॉ. मनोज पाटील, डॉ. उषा पवार यांनी पर्यावरण संवर्धन व शाश्वत जीवनशैलीबाबत आपले विचार मांडले. डॉ. पी. डी. राऊत यांनी पर्यावरण अभ्यास हा अनिवार्य विषय आहे. त्याचा अभ्यासक्रम व त्यामध्ये झालेल्या अलीकडील बदलांबाबत मार्गदर्शन केले. डॉ. श्रुती कुलकर्णी यांनी पर्यावरण कृती कार्यक्रमा विषयी माहिती दिली. आभार डॉ. सोनल चोंदे व डॉ. पल्लवी भोसले यांनी मानले.

19 DEC 2025

सकाळ

# चांगले वाचन म्हणजे यशाचा पाया : डॉ. शिंदे

कोल्हापूर, ता. १८ : 'मोठं व्हायचं असेल तर पुस्तकांशी घट्ट नातं जोडा', असा संदेश देत शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी विद्यार्थ्यांना सातत्यपूर्ण आणि गुणवत्तापूर्ण वाचनाची सवय लावण्याचे आवाहन केले.



बोलताना डॉ. व्ही. एन. शिंदे

महावीर महाविद्यालयात (स्वायत्त) स्वातंत्र्यसेनानी (कै.) दादाबो लडगे चॅरिटेबल ट्रस्ट पुरस्कृत गुणगौरव सोहळ्यात ते बोलत होते. या सोहळ्यात ३६ विद्यार्थ्यांचा शैक्षणिक, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रातील यशाबद्दल प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन सत्कार झाला. संस्थेचे सचिव मोहन गरगटे अध्यक्षस्थानी होते, तर संचालक दिलीप लडगे उपस्थित होते. डॉ. शिंदे म्हणाले, "प्रत्येक पुस्तक नवीन विचारांची खिडकी उघडत असते. कठीण गोष्टी समजून घ्या, त्यांना सोप्या पद्धतीने अंगीकारा आणि जे सोपे असते त्याला सौंदर्यात्मक परिमाण द्या. विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड बौद्धिक क्षमता आहे, योग्य दिशेने प्रयत्न केले, तर कोणतेही शिखर दूर नाही. पालक आणि शिक्षक हे यशाचे पहिले आधारस्तंभ आहेत. डॉ. महादेव शिंदे, कनिष्ठ विभागाचे पर्यवेक्षक जावेद मेस्त्री, विज्ञान विभागाचे प्रा. राहुल आडके, प्रा. सोनल वाळवेकर, प्रा. हेमंत पाटील आदी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. अद्वैत जोशी यांनी स्वागत केले. प्रा. श्वेता परुळेकर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. प्रा. संध्या जाधव, प्रा. निधी आलासे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. शरद गायकवाड यांनी आभार मानले.

19 DEC 2025

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागातील कार्यशाळेच्या उद् घाटन प्रसंगी डॉ. अजय साळी, डॉ. चेतना सोनकांबळे यांच्यासह विद्यार्थी, संशोधक व प्राध्यापक.

# शिक्षणशास्त्र विभागात कार्यशाळा

**कोल्हापूर :** प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात 'स्टेम' अध्यापनशास्त्र 'इनोव्हेटिव स्टेम पेडागॉजी : ब्रीजिंग थिअरी अँड प्रॅक्टिस' विषयावर दोन दिवसीय कार्यशाळा झाली. शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे अध्यक्षस्थानी होत्या. या वेळी आंतरविद्याशाखीय अधिष्ठाता डॉ. अजय साळी यांनी स्टेम (STEM) अध्यापनशास्त्र विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून गरजेची बाब असल्याचे सांगितले. डॉ. रुपाली संकपाळ, डॉ. एन. डी. देशमुख, सरस्वती कांबळे, सारिका पाटील, कादंबरी खांडेकर, डॉ. अंजली गायकवाड, संगीता चंदनवाले, संजना भालकर, संगीता माने, ममता घोटल, अतुल जाधव उपस्थित होते. समन्वयक डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुप्रिया पाटील यांनी आभार मानले.

19 DEC 2025

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

epaper : www.sindhudurgsamachar.com
Mahrashtra : 9422043543 Goa : 9673153300 Karnataka : 9422043300

# सिंधुदुर्ग समाचार

ऐकत रहा FM 90.4

संस्थापक संपादक : भाऊसाहेब कदम
कोल्हापूर
Posted at RMS Kolhapur Postal Reg No : KLR/170/2024-2026

• शुक्रवार दि.१९ डिसेंबर २०२५ • पाने ४ • वर्ष ३५ • अंक २९५ • कोल्हापूर, सिंधुदुर्ग, मुंबई, रत्नागिरी, सांगली, सातारा, बेळगाव, गोवा येथून प्रसिध्द • e-mail: klpsindhu@gmail.com • RNI NO : MAHMAR/2006/17335 • किंमत १ •

# संहिता लेखनाला उत्तम वाचनाचा पाया आवश्यक : प्रवीण टाके



**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

तुमच्याकडे कल्पना आहेत, धडाडी आहे, लिखाणाच्या नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती आहे, मात्र दर्जेदार संहिता उत्कृष्ट लेखनातून निर्माण होत असल्यामुळे संहिता लेखनाला उत्तम वाचनाचा पाया आवश्यक असल्याचे नव्या पिढीने लक्षात घ्यावे, असे मार्गदर्शनपर विचार माहिती उपसंचालक प्रवीण टाके यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील हिंदी भाषा विभागाच्या वतीने आयोजित 'माध्यमे आणि संहिता लेखन' या विषयावर आयोजित मार्गदर्शनपर सत्रात ते बोलत होते. यावेळी हिंदी भाषा विभागाच्या प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी, सहायक संचालक वृपाली पाटील, अभ्यासक्रमाचे समन्वयक प्रा.डॉ. जयसिंग कांबळे, डॉ. प्रकाश निकम तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

श्री.टाके म्हणाले, उत्तम लेखक बनण्यासाठी समाजाचे मूलभूत प्रश्न जाणून त्यावर झालेल्या लिखाणाचे वाचन करणे आवश्यक आहे. समाजाचे निरीक्षण तुम्हाला व्यक्त होण्याची संधी देते, मात्र ते काळाच्या कसोटीवर तपासण्यासाठी काही संदर्भ आवश्यक असतात.

धर्मग्रंथ व त्यांचे उद्देश, पौराणिक कथा व त्यामागच्या भूमिका, प्रेरणादायी व्यक्तिमत्वांचे जीवन चरित्र, भारताचा इतिहास, लोकशाही, संविधान अशा विषयांवरील वाचन सामग्रीतून लिखाणाला धार, प्रगल्भता आणि नाविन्यता येते. एआय किंवा कोणतेही नवे प्रगत तंत्रज्ञान आले तरी तुमच्या मनाची मशागत ही वाचन, मनन, चिंतनानेच होते. लेखक होण्यासाठी वाचन आवश्यक आहे, असे ते म्हणाले.

माध्यम क्षेत्रात उभे रहायचे असेल तर शब्दांना योग्य न्याय देण्यासाठी वाचनाचा पाया भक्कम करणे आवश्यक आहे. माध्यमांचे जग मोठे असून आपण कोणत्या ठिकाणी आहोत, आपण यामध्ये काय करू शकतो, कोणत्या एका विभागात अधिक चांगले करु शकतो, याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. उत्तम लेखक हा निर्मितीच्या क्षेत्रात नेहमीच मागणी असणारा घटक आहे. त्यामुळे वाचन, मनन, चिंतन आणि दर्जेदार लेखन सुरु ठेवण्याची सूचना प्रवीण टाके यांनी विद्यार्थ्यांना केली.

सहायक संचालक वृपाली पाटील म्हणाल्या, माध्यम क्षेत्रात काम करण्यासाठी वाचन, लेखन कला आत्मसात करण्यावरोबरच सामाजिक प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहण्याचा दृष्टिकोन विकसित करणे आवश्यक आहे. या क्षेत्रात काम करताना सत्यता आणि वस्तुनिष्ठता जपणे अत्यंत आवश्यक असते. विविध विषयांवर अभ्यासपूर्ण आणि प्रभावी लेखन करणे हे माध्यम क्षेत्रातील यशाचे गमक आहे. माध्यमे ही लोकशाहीचा चौथा स्तंभ असून लोकशाहीच्या चारही स्तंभांचे पावित्र्य राखण्याची जवाबदारी प्रत्येक व्यक्तीची आहे. वस्तुनिष्ठ बातम्या देताना समाजातील विकासकामांना व प्रश्नांना संवेदनशीलपणे मांडणेही तितकेच आवश्यक आहे. समाजात सकारात्मक बदल घडवायचा असेल तर सामाजिक वास्तवाकडे डोळसपणे पाहून त्या विषयाची अधिकाधिक सखोल माहिती घेऊन अचूक आणि परिणामकारक लिखाण करणे गरजेचे आहे. प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि समाज माध्यमातील लेखनशैली ही वेगवेगळी असून विद्यार्थ्यांनी बातमी, फीचर आणि कंटेंट रायटिंगचे तंत्र आत्मसात करण्यासाठी विविध वृत्तपत्रांचे नियमित वाचन, टिव्ही वरील बातम्यांचे अवलोकन व वृत्तलेखनाचा नियमित सराव ठेवा, असे आवाहन वृपाली पाटील यांनी केले.

सध्या शासकीय, निमशासकीय विभाग, विविध कंपन्यांमध्ये जनसंपर्क अधिकारी पदासह डिजिटल आणि समाज माध्यमात कंटेंट रायटिंगसाठीही मोठ्या संधी उपलब्ध आहेत. वृत्तपत्रविद्या, मास कम्युनिकेशन या अभ्यासक्रमासह संहिता लेखन सारखे अल्प मुदतीचे अभ्यासक्रम पूर्ण करुनही अनेक क्षेत्रात करिअरच्या संधी असल्याचे त्यांनी सांगितले.

माध्यमे, बातमी, लेख, अग्रलेख, कंटेंट रायटिंग, शॉर्ट फिल्म, डॉक्युमेंटरीसाठी संहिता तसेच माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाची प्रसिद्धी यंत्रणा, करिअर संधी या विषयावर सविस्तर माहिती उपसंचालक श्री. टाके व वृपाली पाटील यांनी विद्यार्थ्यांना दिली. प्रश्नोत्तराने मार्गदर्शन सत्राचा समारोप झाला.

सुरुवातीला विभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी स्वागत करुन या अभ्यासक्रमावावत माहिती दिली. परिचय डॉ. प्रकाश निकम यांनी करुन दिला. समन्वयक डॉ. जयसिंग कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले. व्याख्यानाला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

1 9 DEC 2025

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाच्या ६८ अभ्यासक्रमाच्या परीक्षा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर, नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेतील गुरूवारी विविध ६८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने पार पडल्या. जिल्ह्यातील विविध १६६ परीक्षा केंद्रावर परीक्षा झाल्या असून सदर परीक्षांसाठी ११ हजार २१९ विद्यार्थी उपस्थित होते. गुरूवारी १० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले असून आजअखेर १७९ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. परीक्षेत गैरप्रकार रोखण्यासाठी विद्यापीठाने भरारी पथके स्थापन केली आहेत. सदर पथकाकडून गुरूवारी कोल्हापूर १ व सांगली ४ अशा एकूण ५ गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आलेली असून सातारा जिल्ह्यातून कोणत्याही गैरप्रकाराची नोंद करण्यात आलेली नाही. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.